# माय निर्माण स्टोरी - सायली तामणे

*सायली तामणे, मुळची अकोल्याची. पुण्यातून इंजिनिअरींगचे शिक्षण घेतल्यावर नेहमीच्या धोपट मार्गाने जाण्याचा मार्ग तिने निवडला नाही. ती सध्या वाईला रचनावादी शिक्षण पद्धतीने शिकवणाऱ्या शाळेत शिकवते. तसेच महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाच्या इयत्ता ९ वी अणि १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी 'स्व-विकास अणि कलारसास्वाद' या विषयाच्या पुस्तक निर्मितीत महत्वाची भूमिका बजावली. तिच्या या प्रवासाबद्दल...*

## कर के देखो

**'तेविसाव्या वर्षी आयुष्याबद्दल काहीच कळत नाही'.**

माझी आई मला सांगत होती. तिचं काहीच चूक नव्हतं. चांगली हातातली भक्कम पगाराची नोकरी सोडून सामाजिक काम करू इच्छिणाऱ्या तिच्या मुलीला काय समजवावं हे तिलाच कळत नव्हतं.

शाळा, दहावी, बारावी व मग इंजिनियरिंग असा सरधोपट प्रवास करणाऱ्यांपैकी मी पण एक. सदैव 'चांगले मार्क पाडणे' हेच ध्येय उराशी बाळगून असणारी. दहावीच्या वेळेस मेडिकल की इंजिनियरिंग इतकाच काय तो आयुष्यात निर्णय घ्यावा लागला. बाकीचं सगळं ठरलेल्या ठोकताळ्यांप्रमाणेच घडत गेलं. पण इंजिनियरिंगच्या तिसऱ्या वर्षापासून मात्र अभ्यास करायचा कंटाळा आला म्हणा किंवा नाटकाच्या स्पर्धांच्या निमित्याने म्हणा, विचार करायला थोडी उसंत मिळाली. स्वत: कडे पाहताना, माझ्या ध्येयांना मी परत परत तपासून पाहू लागले. त्याच काळात निर्माण शिबिरांमध्ये जाणे झाले. समाजातील समस्या, त्यांची कारणे व ती सोडवण्यासाठी अथक परिश्रम करणारी अनेक लोकं भेटली. त्याआधीपर्यंत सामाजिक प्रश्नांकडे बघण्याची दृष्टी फ़ारच संकुचित होती. मात्र निर्माणमध्ये आयुष्याची एक नवीनच बाजू दिसली. पण तरी आपण हेच केलं पाहिजे असं तेव्हा वाटलं नाही.

शेवटी एक दिवस मी पासआऊट झाले आणि कॅम्पस प्लेसमेण्टमध्ये लागलेल्या जॉबवर रुजू झाले. पहिले काही दिवस खूपच छान गेले. वयाच्या २२व्या वर्षीच हातात खूप पैसा खेळू लागला. पण हळूहळू त्याचं ही तितकंसं आकर्षण वाटेनासे झाले. आतापर्यंतच्या आयुष्यात शिक्षण, नोकरी, पैसा या ध्येय मालिकेच्या शेवटच्या टप्प्यावर मी येऊन पोहोचले होते. आता यापुढे काय? हा प्रश्न कितीही टाळायचा म्हणलं तरी परत परत समोर येऊन उभा राहायचा. सतत कश्याच्या तरी मागे पळत राहण्याची सवय लागल्यामुळे आता खूपच रिकामं रिकामं वाटत होतं. एम.एस करायचं, अजून पैसा कमवायचा असं काहीतरी करता आलंच असतं. पण घरात नेहमीच पैसा होता, कशाचीच कमी नव्हती. त्यामुळे अजून पैसा कशासाठी हा प्रश्न पडायचा. बरं लहानपणापासून सर्व काही मिळाल्यामुळे, कशाचेही फारसे आकर्षण वाटेनासे झाले. कधीच स्ट्रगल करावा लागला नाही, कधीच मन मारावे लागले नाही. त्यामुळे आपल्याला अमूक एक गोष्ट हवी आहे असं कशाबद्दलच वाटेना. शेवटी आपण का जगतोय, आपल्या आयुष्याचं ध्येय काय वगैरे प्रश्नांकडे वळायला लागलं. मी नास्तिक असल्यामुळे कदाचित मला या प्रश्नांचा जास्त त्रास झाला. मी करत होते ते कामही मला फारसे आवडेना. त्यात थोड्याफार प्रमाणात तोच तोचपणा यायला लागला. त्यामुळे रोज सकाळी उठून आपण हे का करतोय असा प्रश्न पडे.

शेवटी एक दिवस हिंमत करून नोकरी सोडली. घरी सगळ्यांनाच मोठा धक्का बसला. त्यांनी मला परावृत्त करायचा खूप प्रयत्न केला. सध्याच्या रिसेशनच्या काळात असं करणं म्हणजे शुद्ध मूर्खपणा आहे असं सगळ्यांचंच मत पडलं. पण त्यांनी मला कधीच कशासाठीच अडविलं नसल्यामुळे, यावेळीही त्यांनी मला माझ्या मनाप्रमाणे करू दिलं. पण मूळ प्रश्न अजूनही कायम होता. नोकरी तर सोडली, आता नक्की काय करायचे? सामाजिक कार्य हा एक पर्याय होता. पण सामाजिक कार्याचा पिंड, त्याला लागणारी निष्ठा, श्रद्धा, कष्टाळू वृत्ती, कमी पैशांत, असेल तश्या परिस्थितीत राहण्याची तयारी हे सगळं मला जमेल का? कितीही म्हटलं तरी बोलण्यात आणि करण्यात फरक असतो. पैशाने फरक पडत नाही असं म्हणणं आणि खरंच हातात पैसे नसणं हे खूप भिन्न आहे. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे मला सामाजिक प्रश्नांबद्दल असणारा कळवळा खरा आहे की स्वत:कडून केलेली अपेक्षा? असे बरेच प्रश्न होते. शेवटी ठरवलं, करून बघायचं. कदाचित मी चुकत असेनही; पण हे करून पाहिलं नाही तर ते कधीच कळणार नाही, फक्त मनात कुठेतरी सलत राहील.

सध्या मी ग्राममंगल नावाच्या संस्थेमधे काम करते आहे. प्रयोगशील शिक्षणामध्ये ग्राममंगल गेली अनेक वर्ष कार्यरत आहे. रमेश पानसे व अनुताई वाघ यांनी सुरू केलेल्या या प्रयोगाला आता भव्य रूप आलं आहे. मेंदूआधारित शिक्षण, मल्टिपल इंटेलिजेंस थिओरी, सेल्फ़ लर्निंग प्रिंसिपल, प्रत्यक्ष कृतीतून शिकणं, गटपद्धती, प्रकल्पपद्धती इत्यादि अनेक प्रयोगातून मुलांना उत्तम दर्ज्याचे व सर्वांगीण, अर्थपूर्ण शिक्षण देण्याचा प्रयास असतो. डहाणू तालुक्यातील ऐने येथे आदिवासी मुलांसाठी चालवलेली शाळा, पुण्यामधलं लर्निंग होम, वाई येथील गरीब व गरजू विद्यार्थ्यांसाठी चालवलेलं भारत विद्यालय ही या प्रयोगांची प्रमुख केंद्रे आहेत. मराठी माध्यमाच्या मुलांची व एकूणच मराठी माध्यमाच्या शाळांची इंग्रजीपायी होणारी दुर्दशा लक्षात घेऊन एक 'द्विभाषा प्रकल्प' सुरू करण्यात आला आहे. इंग्रजी व मराठी या दोन्ही भाषांचा एकत्र विकास व्हावा हा या प्रकल्पाचा उद्देश आहे. मातृभाषेतून शिकण्याचे फ़ायदे मुलांना मिळावे व त्याचबरोबर आजच्या युगात अत्यंत गरजेचं असणारं इंग्रजीसुद्धा अस्खलितपणे बोलता यावे असा प्रयत्न आहे. लेखन आणि वाचन यावर असलेला भर बदलून भाषेच्या संदर्भात ऐकणं व बोलणं यावर भर देणं गरजेचे आहे. कारण भाषा ही मुख्यत्वे ऐकून व बोलून येते. हे काम द्विभाषा प्रकल्पाच्या माध्यमातून सुरू आहे. अशा सगळ्या प्रयोगांशी मी सध्या संलग्न आहे.

मी काम करत असलेले पाच महिने मला फार शिकवून गेले. सामाजिक क्षेत्रात तरुण, विचारी व अभ्यासू लोकांची असलेली गरज पावलोपावली जाणवते. संगठनाच्या, दूरदृष्टीच्या, व्यापक विचाराच्या आणि कार्यक्षमतेच्या अभावामुळे या क्षेत्रात प्रगतीचा वेग फारच कमी आहे. हे सगळे फ़क्त नवीन चांगल्या लोकांनी इकडे वळल्यावरच होऊशकेल.

आजच्या क्षणाला मी अत्यंत आनंदी आहे, समाधानी आहे. उद्या असेन का? माहीत नाही. कदाचित नसेनही. नसलंच तर दुसरं काही शोधीन. पण उद्या काय असेल हे कुणाला माहिती आहे? त्यापेक्षा आजचा आनंद शोधणं, हातातल्या संधीचे चीज करणं जास्त श्रेयस्कर आहे, नाही का? माझं असं अजिबात मत नाही की प्रत्येकाने सामाजिक कार्यात उतरावे किंवा ती प्रत्येकाची जवाबदारी आहे. पण मला असं मनापासून वाटतं की आपल्याला जे सर्वाधिक आवडते तेच करावे. आणि आपल्याला काय आवडतं हे कुठेतरी प्रत्येकाला माहिती असतं. अवकाश असतो तो फक्त ते स्वीकारण्याचा. प्रत्येकानेच त्याला आवडणारी गोष्ट केली तर प्रत्येकच जण ती अतिशय उत्तमरीतीने करेल. प्रत्येकाची सृजनशीलता फुलेल. कदाचित म्हणूनच निसर्गात प्रत्येक व्यक्ती, त्याचे विचार, त्याची आवड वेगळी आहे. Perhaps this is the best way to make the world a better place to live in.



- सायली तामणे
sayali.tamane@gmail.com



## एका पाठ्यपुस्तकाचा जन्म

*सायली तामणे (निर्माण १) हिने महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाच्या इयत्ता ९ वी अणि १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी 'स्व-विकास अणि कलारसास्वाद' या विषयाच्या पुस्तक निर्मितीत महत्वाची भूमिका बजावली. ह्या पुस्तकच्या निर्मितीच्या अनुभवाबद्दल सायली सांगतेय...*

लहानपणी, उन्हाळ्याच्या सुट्टीनंतर शाळा सुरू होण्यामध्ये मला खरंतर एकच आनंद असायचा, नवीन पाठ्यपुस्तकं हातात मिळण्याचा! नवी कोरी पाठ्यपुस्तकं, त्यांचा वास घेणं, अधाश्यासारखी त्यांतली सगळी चित्रं आधी पाहणं आणि मग भाषेच्या पुस्तकांतली एक-एक गोष्ट जेवताना चवीने वाचणं हा माझा आवडता छंद. बालभारतीच्या पुस्तकांमधील चित्रं मला विशेष आवडायची. चाचा चौधरी किंवा बल्लू वगैरे कॉमिक्समधील चित्रेदेखील मला अशीच आवडायची. त्यांतले चेहरे अतिशय भोळे असायचे. कितीही मोठ्या इमारतीवरून तुम्ही खाली पडलात तरी फक्त एखादा हात मोडायचा, बॉम्ब फुटला तरी फक्त कपडे काळे व्हायचे, वगैरे. थोडक्यात त्या जगात फार वाईट काही होणारच नाही अशी एक शाश्वती वाटायची. मला अजूनही आठवतं, मी पुण्यात नवीन आल्यावर पहिल्यांदा बालभारतीची इमारत पाहिली तेव्हा खूप वेळ बघत राहिले. याच इमारतीत आपलं सारखं येणं-जाणं होईल असं कधी स्वप्नातही वाटलं नव्हतं. तो योग आला 'स्व-विकास आणि कलारसास्वाद' या पुस्तकाच्या निर्मितीच्या निमित्ताने.




इयत्ता नववी आणि दहावी हा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण काळ असतो. याच काळात विद्यार्थ्यांमध्ये झपाट्याने शारीरिक, मानसिक बदल घडत असतात आणि त्या सर्व बदलांचा प्रभाव त्यांच्या अभ्यासावर, पालकांशी-शिक्षकांशी असलेल्या संबंधावर, विद्यार्थ्यांनी घेतलेल्या निर्णयांवर पडत असतो. तसंच या काळात विद्यार्थ्यांची स्वत:ची ओळख निर्माण होण्याची प्रक्रिया सुरू होते. मुलांची 'स्व'त्वाची जाणीव या काळात वाढीस लागते. आपण कोण आहोत, आपल्या आवडीनिवडी काय आहेत याचा मुलं जागरूकपणे विचार करू लागतात. दहावीनंतर आपण काय करणार, कुठली बाजू निवडणार यासंबंधीचे विचारदेखील मुलांच्या मनात घर करू लागतात. दुर्दैवाने या सर्व मुद्द्यांना थेटपणे हात घालणारा कुठलाच विषय आपल्या शालेय अभ्यासक्रमात नाही.

National Curricular Framework, 2005 म्हणजेच 'राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड्या'मध्ये या सर्व बाबींचा उल्लेख केलेला आपल्याला आढळतो, मात्र पाठ्यपुस्तकांमध्ये त्यांचा थेटपणे समावेश झालेला नाही.

खरं सांगायचं तर मूल्यांप्रमाणेच स्व-विकास हा विषय वेगळा न ठेवता, मुलांच्या १० वर्षांतल्या शालेय प्रवासात केल्या जाणाऱ्या अभ्यासातूनच त्यांना स्वत:बद्दलची स्पष्टता आपसूक येणं अपेक्षित असावं. मात्र शिक्षणाचे तुकडे पाडून फक्त आपापला विषय शिकवण्याकडे झुकलेल्या आपल्या शिक्षणपद्धतीत हे उद्दिष्ट कुठेतरी फार मागे पडून जातं. याआधी व्यक्तिमत्त्वविकास किंवा व्यवसायमार्गदर्शन अशा वैकल्पिक विषयांद्वारे ते साध्य करण्याचा प्रयत्न झाला; तरी या विषयांना पाठ्यपुस्तक नसल्याने अनेक शिक्षक गाईडचा वा व्यवसायमालेचा आधार घेऊन शिकवत आणि मग 'संस्कारांची व्याख्या लिहा' (हा खऱ्या गाईडमधील खरा प्रश्न आहे) या पातळीवर सगळंच प्रकरण येऊन थांबे.

या विषयाची सुरुवात करताना 'स्व-विकास' म्हणजे नक्की काय इथपासून अभ्यासाला सुरुवात झाली. त्याआधी 'स्व' म्हणजे काय याबद्दल अभ्यास केला. त्याबद्दल अनेक रिसर्च पेपर वाचले, संदर्भ तपासून पाहिले. 'स्व-ओळख' मध्ये कशाचा समावेश होतो? फक्त व्यक्तीच्या गुणवैशिष्ट्यांचा? की तिच्या सामाजिक-सांस्कृतिक ओळखीचा? या वयात मुलांच्या मनात येणाऱ्या प्रश्नांबद्दल शास्त्रोक्त मांडणी काय आहे, आपल्या राज्यातल्या मुलांना नेमक्या कोणत्या अडचणींना सामोरे जावं लागतं, याआधी असणाऱ्या व्यक्तिमत्त्वविकास किंवा व्यवसायमार्गदर्शन या विषयांमध्ये कुठल्या मुद्द्यांवर भर दिला गेला होता, या प्रश्नांचा बारीक अभ्यास केला. या कामी डॉ. शिरिषा साठे, शीतल बापट, विद्यानिधी (प्रसाद) वनारसे यांचं अत्यंत मोलाचं मार्गदर्शन मिळालं. मुख्य म्हणजे हे सर्वच जण विविध स्तरांवर मुलांसोबत काम करत असल्यामुळे फक्त क्लिष्ट शास्त्रीय माहिती किंवा संकल्पना देण्याचा मोह कुणालाच झाला नाही.

पाठ्यपुस्तकाचं स्वरूप कसं असावं याचा विचार करताना, दोन गोष्टी पक्क्या ठरवल्या होत्या. पहिली म्हणजे पाठ्यपुस्तक हे ज्ञानरचनावादावर आधारलेले असेल. ज्ञानरचनावाद असं सांगतो, की कुठलंही ज्ञान आपण रेडिमेड आणून मुलाच्या डोक्यामध्ये ओतू शकत नाही. ज्ञान हे प्रत्येकाने स्वत:साठी, स्व-प्रयत्नातून निर्माण करायचं असतं. म्हणजे काय, तर एखाद्याने मला एखादी माहिती सांगितली, की लगेच ती पाठ करून तिचं ज्ञानात रूपांतर होत नाही. एखादी व्यक्ती जेव्हा तिला आलेल्या अनुभवाचा अर्थ लावते, त्यातून एखादं मूर्त वा अमूर्त सूत्र शोधते, आपल्या पूर्वानुभवाशी ते ताडून बघते आणि मग ते स्वीकारते, तेव्हाच त्या माहितीचं खऱ्या अर्थाने ज्ञानात रूपांतर होतं नि त्या ज्ञानाचं उपयोजन ती व्यक्ती करू शकते. असं म्हणतात, 'The aim of education is to unsettle'. ज्ञानरचनावादी शिक्षणाचा पाया विसंवादातून बोध घेण्यात – म्हणजे 'cognitive dissonance' निर्माण करण्यात – आहे. म्हणजे काय, तर जेव्हा आपल्या मेंदूला दोन परस्परविरोधी अनुभव मिळतात, तेव्हा त्या दोन्हींचा अर्थ लावल्याशिवाय आपल्या मेंदूला चैन पडत नाही; कारण आपल्या डोक्यात कुठल्याही विषयासंबंधी एक सुसूत्र चित्र निर्माण करण्याचा मेंदू प्रयत्न करत असतो. त्यामुळे एखाद्याला विचार करायला भाग पाडण्याचा सर्वांत परिणामकारक मार्ग म्हणजे त्याच्यासमोर दोन परस्परविरोधी अनुभव ठेवणं किंवा त्याच्या मताला छेद देईल अशी माहिती वा प्रश्न त्याच्यासमोर निर्माण करणं.

एक उदाहरण पाहू – सजीव म्हणजे काय याची पुस्तकी व्याख्या पाठ केलेल्या मुलांना जर असं विचारलं, की 'आग तिच्या रस्त्यात येणाऱ्या सर्व गोष्टी खाते, धूर बाहेर निघतो या अर्थी श्वासोच्छवास करते, आग पुढे पसरत जाते म्हणजे स्थानदेखील बदलते आणि आग वाढत जाते

या अर्थी तिचं प्रजननदेखील होतं. मग आग सजीव आहे का?' तर नक्की सजीव म्हणजे काय याचा विचार करणं त्यांना भाग पडतं आणि मग सजीवांची व्याख्या अधिक सखोलपणे, तिच्या मर्यादेसह मुलांना कळते. त्यामुळे सुरुवातीला पाठ्यपुस्तकाने कोणतीही थेट माहिती मुलांना न पुरवता अनेक प्रश्न निर्माण करावेत आणि त्या प्रश्नांची उत्तरं शोधताना होणाऱ्या वैचारिक संघर्षातून मुलांनी स्वत:चं मत बनवावं, स्वत:साठी एक बाजू निवडावी किंवा किमानपक्षी कुठलीच बाजू निवडता येत नाहीये याची जाणीव त्यांना व्हावी आणि त्यातून मुलांचं शिक्षण व्हावं. दुसरं म्हणजे जरी आपण कितीही विविध उपक्रम दिले आणि त्यावर प्रश्न विचारले, तरी जर शिक्षकांनी ते वर्गात वापरलेच नाही, गाळून टाकले तर? म्हणून फक्त शिक्षकांवर अवलंबून न राहता मुलांनी पुस्तक हातात घेतल्यावर त्यांना स्वत:ला ते प्रश्न इंट्रेस्टिंग वाटावेत, अशा प्रकारे पुस्तक तयार केलं पाहिजे; जेणेकरून कोणी काही शिकविलं नाही, तरी मुलांना त्यातले उपक्रम स्वत: करून बघता येतील.

**मूल्यमापन**

| भारांश : १०% | | | | |
|---|---|---|---|---|
| निकष | उत्तम (खूप चांगले) | योग्य (समाधानकारक) | अयोग्य (असमाधानकारक) | गुण |
| नाटकातील कामगिरी | व्यक्तिरेखेच्या आवाजाचा आणि देहबोलीचा पुरेसा विचार दिसला. नाटकात संघर्ष होता. | व्यक्तिरेखेच्या आवाजाचा आणि देहबोलीचा काही प्रमाणात विचार दिसला. नाटकात संघर्ष नव्हता. | व्यक्तिरेखेच्या आवाजाचा आणि देहबोलीचा अजिबात विचार दिसला नाही. नाटकात संघर्ष नव्हता. | |
| संगीत | संगीतातील ठेका, सुरवट आणि भाव कवितेशी मिळता जुळता होता. सुरावट स्वतः बांधलेली होती. | संगीतातील ठेका, सुरावट आणि भाव कवितेशी मिळता जुळता होता. | संगीतातील ठेका, सुरावट आणि भाव यांच्यापैकी एकच गोष्ट कवितेशी मिळती जुळती होती. | |
| नृत्य दिग्दर्शन | नृत्य गाण्याच्या तालात बसत होते. नृत्यातील हालचाली, गाण्यातील शब्दांशी आणि संगीताशी जुळणाऱ्या होत्या. नर्तकाच्या चेहऱ्यावरचे हावभाव साजेसे होते. | डावीकडील ३ पैकी दोन मुद्दे सादरीकरणात होते. | डावीकडील ३ पैकी एकच मुद्दा सादरीकरणात होता. | |

पुस्तकाचा पहिला खर्डा वाचला तेव्हा आणि तो लिहितानादेखील असं लक्षात आलं, की काहीच माहिती थेट न देणं शक्य होणार नाही. खरंतर एखादा अनुभव देणं, त्यावर प्रश्न विचारणं, त्यावर मुलांनी विचार करून एखादा निष्कर्ष काढणं, त्यावर प्रतिप्रश्न करणं, परत मुलांनी विचार करणं अशी शिक्षणाची एक सलग प्रक्रिया असते वा निदान असावी. मात्र पाठ्यपुस्तकात तुम्हांला एखाद्या अनुभवावर एकदाच प्रश्न उपस्थित करता आला असता. वाढीस पूरक मानसिकता (Growth Mind-set), किंवा करिअर कसे निवडावे याबद्दल अनेक नवीन संकल्पना पुस्तकात होत्या आणि फक्त अनुभव देऊन मुलांना प्रश्न विचारले, तरी त्यातून ती काय निष्कर्ष काढतात त्यावर पुस्तक लिहिणाऱ्याचा काही ताबा असणार नव्हता. त्या वेळी, समोरासमोर शिक्षण आणि इ-लर्निंग किंवा पाठ्यपुस्तक या दोन प्रकारच्या माध्यमांतला फरक दिसून आला. पुस्तक या माध्यमाच्या अनेक मर्यादा समोर आल्या. त्यामुळे माझ्या आदर्शवादी संकल्पनांना थोड्या प्रमाणात मुरड घालावी लागली.

सुरुवातीला एखाद्या व्यवसायासारखी या पुस्तकाची रचना असावी असा विचार होता; जेणेकरून मुलांना त्यात दिलेली एखादी कृती करून झाल्यावर

त्याखालीच त्यांचे अनुभव, मत मांडता आलं असतं. मात्र यात दोन अडचणी समोर आल्या. एक म्हणजे अनेक विद्यार्थी आर्थिक कारणांसाठी दुसऱ्याची पुस्तकं पुन्हा वापरतात. दुसरं म्हणजे ठरावीक आकाराच्या रिकाम्या ओळींमध्ये उत्तर बसवताना, मुलांच्या अभिव्यक्तीवर खूपच मर्यादा येऊ शकतात असं जाणवलं. स्वतःबद्दल मला काय वाटतं हे पाच ओळींमध्ये बसवण्याची सक्ती करणं फारच अन्यायाचं झालं असतं. मी शैक्षणिक तंत्रज्ञानाचं उच्चशिक्षण घेतलेलं असल्यामुळे कल्पनेचे घोडे मी खूप वेगाने पळवत होते. पुस्तकात खेळासारख्या रचनेचा (gamification) वापर करता येईल का? एखाद्या खेळासारखी पुस्तकाची रचना करता येईल का, जेणेकरून प्रत्येक उपक्रमानुसार खेळणाऱ्याला काही गुण मिळतील आणि खेळाच्या पुढच्या फेरीत पोचता येईल? किंवा हे एखादं गोष्टीचं पुस्तक होऊ शकेल का, ज्यात गोष्ट पुढे-पुढे जाईल तसतशी त्यातल्या व्यक्तिरेखांच्या माध्यमातून एक-एक संकल्पना वा एक-एक उपक्रम उलगडला जाऊ शकेल? अखेर वेळ, पृष्ठसंख्या आणि निर्माण होणारी गुंतागुंत लक्षात घेता फक्त एका गोष्टीने सुरुवात करून प्रत्येक प्रकरणाच्या आधी त्या प्रकरणाशी संबंधित एक व्यंगचित्राचं पान असावं, एवढीच मर्यादित कल्पना राबवणं शक्य झालं.

नंतरचा प्रश्न होता भाषेचा. पुस्तकातली भाषा क्लिष्ट, औपचारिक, शासकीय आणि निरस नसावी. सोपी, कुणालाही सहज समजण्याजोगी, मैत्रीपूर्ण वाटण्यासारखी अशी असावी. मात्र ती बाळबोध किंवा कृत्रिमपणे गोड-गोड देखील होता कामा नये याचं सतत भान ठेवावं लागलं. मूळ खर्डा इंग्रजीत लिहिल्यामुळे भाषांतर करताना एकच तारांबळ उडाली. अनेक उदारमतवादी आणि वस्तुनिष्ठ संकल्पनांना मराठीत योग्य शब्दच नाहीत (किंवा ते मला सापडले नाहीत) असं लक्ष्यात आलं. उदा. Stereotype ला योग्य मराठी शब्द कुठला? किंवा 'Have you ever found yourself making sand castles on the beach?' यातली त्रयस्थपणे स्वत:कडे बघण्याची छटा मराठीत कशी पकडायची? पुस्तक लिहिताना त्यातली उदाहरणं वा प्रसंग एखाद्या विशिष्ट आर्थिक, सामाजिक, भौगोलिक प्रदेशातल्या विद्यार्थ्यांपुरतेच मर्यादित तर राहत नाहीत ना, अशी शंका सारखी वाटायची. आपली जात, आपली आर्थिक-सामाजिक परिस्थिती चुकून आपल्या लिखाणात उतरतेय का? आणि किती प्रमाणात? असा विचार सारखा व्हायचा. बालभारतीचं काम, व्याप किती मोठा आहे हे अगदी जवळून पाहून थक्क व्हायला होत असे.

पुस्तकातली चित्रं हा एक स्वतंत्र महत्त्वाचा विषय. चित्रं जितकी अधिक तितकी चांगली असं वाटत असताना ती मजकुराला डोईजड तर होत नाहीत ना, याची काळजी घ्यावी लागत होती. बरं, चित्रं जितकी वाढवावी तितकी पृष्ठसंख्या आणि पर्यायाने पुस्तकाची किंमत वाढत जाणार हे समीकरण ठरलेलंच. एस.एस.सी बोर्डाच्या प्रत्येक विद्यार्थ्याला विनाकारण भुर्दंड! सगळी चित्रं हातात आल्यावर लक्षात आलं की काही चित्रांत दाखवलेली मुलं नववीच्या वयोगटापेक्षा लहान वाटत आहेत. मग ती परत बदलली.

पुस्तकाचं परीक्षण करताना शिक्षकांनी अपघाताबद्दलच्या एक-दोन रेखाचित्रांवर आक्षेप घेतला. तसंच व्यसनांबद्दलच्या स्वाध्यायात वापरलेलं, सिगारेट ओढणाऱ्या मुलाचं चित्रदेखील काढून टाकावं अशी सूचना आली. लैंगिकतेबद्दलचा आशय लिहायला घेतला, तर त्यासाठी एकही शब्द लिहिण्याअगोदरच तो मजकूर आक्षेपार्ह ठरेल अशी शंका आली होती. तसंच झालं. मला

लगेच पहलाज नेहलानी आणि सेन्सर बोर्ड आठवले. श्यामलाताई वनारसेंनी तज्ज्ञांच्या नजरेतून पुस्तकाचं परीक्षण करताना नोंदवलेलं एक मत मला खूप विचारात पाडून गेलं. त्या म्हणाल्या, "पुस्तकात Stereotypes बद्दल लिहिताना आपण चित्रं मात्र प्रचलित Stereotypes चीच वापरली आहेत. म्हणजे जे बदलायला हवं, तेच एका अर्थाने आपण मुलांच्या मनावर ठसवत आहोत."

पाठ्यपुस्तकाच्या विषयात 'कलारसास्वाद' देखील असल्यामुळे शिक्षकांच्या दृष्टिकोनातून समीक्षण करण्यासाठी आलेले बरेच शिक्षक हे कलाशिक्षक होते. त्याआधीच कला आणि कार्यानुभव या विषयांचे तास कमी केल्याचं शासकीय परिपत्रक निघाल्यामुळे कलाशिक्षक आंदोलन करत होते. या पार्श्वभूमीवर 'स्व-विकास आणि कलारसास्वाद' या पुस्तकामध्ये कलेला काहीच महत्त्व देण्यात आलेलं नाही आणि असलेले सर्व उपक्रम बाळबोध आहेत, असाही त्यांचा आक्षेप होता. मुख्य भारांश (weightage) कलारसास्वादाला द्यावा, जेणेकरून कलाशिक्षकांचे शिकवण्याचे तास वाढतील, असाही त्यांच्या मागणीचा रेटा होता. शेवटी थोडं तुमचं-थोडं माझं, असं करत-करत कलेचे बरेच उपक्रम अंतर्भूत करण्यात आले आणि आता पुस्तक बघता ते चांगलंच झालं, असं वाटतं.

पुस्तक प्रकाशनाला जाण्याआधी शेवटच्या क्षणापर्यंत आम्ही पुन्हा पुन्हा त्याची मुद्रितं तपासत होतो. पुस्तकात काहीतरी आक्षेपार्ह लिहिल्यामुळे आपल्या घरावर दगड पडत आहेत किंवा मोर्चा चालून येत आहे असं स्वप्नदेखील मला दोन-तीनदा पडलं! १७ लाख विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचणारं पुस्तक ही किती मोठी जबाबदारी आहे, हे सारखं जाणवायचं आणि खरं सांगायचं तर त्याचं खूप दडपणदेखील यायचं. पुस्तकात राजर्षी शाहू महाराजांचा उल्लेख फक्त शाहू महाराज एवढाच झालाय असं शेवटचं मुद्रित तपासताना लक्षात आलं, तेव्हा एकदम घाबरगुंडी उडाली. तडक फोन फिरवण्यात आले आणि तत्काळ बदल करण्याचं फर्मान सोडण्यात आलं.

मूल्यमापन हा अजून एक महत्त्वाचा मुद्दा. सुरुवातीपासूनच या विषयाची लेखी परीक्षा नसावी, हे सर्वांचंच मत पडले. लेखी परीक्षा म्हटलं की रिकाम्या जागा भरा, व्याख्या करा हे ओघानं आलंच! लेखी परीक्षा नसल्यास कोणी या विषयाकडे ढुंकूनही पाहणार नाही अशी शक्यता अनेकांनी बोलून दाखवली. मात्र लेखी परीक्षा ठेवल्यास या विषयाचं उद्दिष्ट आणि शिकवायची पद्धत दोन्ही बदलेल, ही भीती वाटल्याने आम्ही 'परीक्षा नको' या आमच्या निश्चयावर ठाम राहिलो. पाठ्यपुस्तकातले सर्व उपक्रम पूर्ण केले तर विचार करणं मुलांना निश्चितच भाग पडेल आणि तेच या विषयाचं साध्य आहे. त्यामुळे खरंतर हे सर्व उपक्रम पूर्ण केलेत का, कशा पद्धतीने केलेत यावरच मूल्यमापन व्हायला पाहिजे हे लक्षात आलं. तरीसुद्धा एखाद्या प्रकरणात कशावर भर द्यावा, काय महत्त्वाचं आहे हे शिक्षक आणि विद्यार्थी दोघांना समजणं महत्त्वाचं आहे. अनेक संशोधनांतून असं दिसून आलं आहे की मूल्यमापनाचे निकष विद्यार्थ्यांना सुरुवातीलाच माहिती असल्यास ते त्या दृष्टीने अधिक प्रयत्न करतात आणि त्यांचा मूल्यमापनपद्धतीवरील विश्वास वाढतो. पाठ्यपुस्तकांच्या इतिहासात कदाचित पहिल्यांदाच असे घडलं असेल; की मूल्यमापन कोणत्या घटकांच्या आधारे होणार आहे, काय केल्यास आपल्याला पूर्ण गुण मिळतील हे प्रत्येक प्रकरणानंतर स्पष्टपणे देण्यात आलं आहे. हे विद्यार्थी आपण शिकलेल्या संकल्पनांचं किती उपयोजन करतात यानुसार सर्व मूल्यमापन करण्यात आलं आहे.

सर्वांत महत्त्वाचं म्हणजे या पुस्तकावर काम करताना बालभारती करत असलेल्या अफाट कामाबद्दल आदर वाढला. अनेक तज्ज्ञांची मोट बांधून त्यांच्या सतत मीटिंग्स घेऊन कोणालाही न दुखावता पाठ्यपुस्तकं तयार करून घेणं; ३६ जिल्ह्यांमधल्या शिक्षकांकडून त्यांचं परीक्षण करून घेणं; त्यात प्रत्येकाच्या मताचा आदर करत बदल करणं; वापरलेल्या प्रत्येक चित्राच्या वा साहित्याच्या स्वामित्वहक्काची शहानिशा करून घेणं; सगळे संदर्भ नीट तपासणं; त्यातली भाषा, मान्यवरांचे उल्लेख, मुद्रितं पुन्हा पुन्हा तपासून, रंगसंगती, किंमत यांचा मेळ घालून त्याचं मुद्रण करून घेणं; आणि महाराष्ट्रातल्या कानाकोपऱ्यात असणाऱ्या ३५८ तालुक्यांतल्या १७ लाख विद्यार्थ्यांपर्यंत ते पोहोचवायची सोय करणं. आणि हे सगळं ठरावीक वेळेच्या आणि संसाधनांच्या चौकटीत राहून! नेहमीच टीकाकाराच्या भूमिकेतून पाठ्यपुस्तकांकडे बघताना, त्या कामामागची मेहनत, विचार आणि मुख्य म्हणजे महाराष्ट्रातल्या प्रचंड भाषिक, भौगोलिक विविधतेचं राखलेलं भान कधीच लक्षात आलं नव्हतं. अगदी पालघर, नंदुरबार, मेळघाट, गडचिरोली इथल्या, मराठी भाषेतदेखील ज्यांना अडचणी येतात अशा आदिवासी मुलांपासून, निमशहरी जिल्हापरिषदेच्या शाळेत जाणाऱ्या, महानगरातल्या वस्त्यांमध्ये राहून महानगरपालिकेच्या शाळेत जाणाऱ्या, पुण्या-मुंबईतल्या इंग्रजी माध्यमाच्या शाळांत जाणाऱ्या, खूप एक्स्पोझर मिळालेल्या, वर्षाला लाखभर रुपये भरून शिकणाऱ्या उच्चमध्यमवर्गीय मुलांपर्यंत सगळ्यांनाच अर्थपूर्ण वाटेल असा आशय, उपक्रम आणि मांडणी करणं हे निश्चितच खूप मोठं आव्हान बालभारतीपुढे असतं.

कुठलंही काम करताना ते कसं चुकू शकेल, त्यात कशा त्रुटी राहतील अशा विचारांनी आधीच बिचकून मोठ्या जबाबदाऱ्या टाळण्याकडेच कल असणाऱ्या माझ्यासारख्या मुलीसाठी या पुस्तकावर काम करणं, ही एक मोठी उडी होती. पुस्तक प्रकाशित झालं. त्यावर बहुतांश चांगल्या आणि थोड्या वाईट प्रतिक्रियादेखील आल्या. मात्र या सर्वांपेक्षा जास्त भावलेली प्रतिक्रिया मला माझ्या शाळेतल्या मुलांकडून मिळाली. माझ्या तासाला व्यवसाय करण्याबद्दल मी काहीतरी महत्त्वाचं सांगत असताना माझ्याकडे काडीमात्र लक्ष न देता माझी मुलं नुकतंच हातात पडलेलं ‘स्वविकास आणि कलारसास्वादा’चं पुस्तक वाचण्यात हरवून गेली होती!

*सायलीचा हा अनुभव ‘रेषेवरची अक्षरे’ या मराठी ब्लॉगवर याआधीच प्रकाशित झाला होता.*

http://www.reshakshare.com/2017/10/1037/




**सायली तामणे, निर्माण १**

sayali.tamane@gmail.com